मुहम्मद च्या घरच्यांजवळ अनेक महिला तक्रार करत आल्या,व ते पुरुष पुरुषोत्तम नाहीत

इयास बिन अब्दुल्ला बिन अबी जुबाबा सांगतात की प्रेषित मुहम्मद सलामती असो त्यांच्यावर फरमावितात की: <> मग उमर बिन खत्ताब रजिअल्लाहु अनहु प्रेषितांजवळ तक्रार करत म्हणाले की:महिला आपल्या पतिंवर वरचढ ठरत आहेत व अवज्ञा करत आहेत, त्यावर प्रेषितांनी [सलामती असो त्यांच्यावर] त्यांना समज देण्याकरता हलका मार मारण्याची परवानगी दिली, तद्नंतर प्रेषितांच्या [सलामती असो त्यांच्यावर] घरी अनेक महिला
तक्रार करत दाखल झाल्या, त्यावर प्रेषितांनी [सल्लल्लाहु अलैही व सल्लम] फरमाविले की:<>.
[صحيح] [رواه أبو داود وابن ماجه]

सुरुवातीला प्रेषितांनी [सलामती असो त्यांच्यावर] स्त्रीयांना मारण्यास मनाई केली होती, नंतर उमर बिन खत्ताब रजिअल्लाहु अनहु प्रेषितांजवळ तक्रार करत म्हणाले की: महिला आपल्या पतिंची अवहेलना व उद्धटपणे वागत आहेत. त्यावर प्रेषितांनी [सलामती असो त्यांच्यावर] अशा उद्धट वर्तणुक करणाऱ्या साठी, त्यांना सौम्य मारण्याची परवानगी दिली, परंतु जबर मार नसावा. त्यानंतर पुष्कळ महिला प्रेषितांच्या [सलामती असो त्यांच्यावर] पत्नी जवळ तक्रार घेऊन आल्या, की त्यांना त्यांचे पती नाहक जबर मारत आहेत, त्यावर प्रेषितांनी [सलामती असो त्यांच्यावर] फरमाविले की: जे पुरुष आपल्या पत्नीला मारतात ते आदर्श [चांगले]पुरुष नाहीत.

http://sunnah.global/hadeeth/mr/show/5821